# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

## लेखापरिक्षण विभागाकडे सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर लेखापरिक्षण अधिकारी यांची नियुक्ती करण्याबाबत.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडील लेखापरिक्षण विभागाकडे ११ महिने या कालावधीसाठी सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर "लेखापरिक्षक अधिकारी" या पदासाठी इच्छुक उमेदवारांकडुन दिनांक २९ /६/२०२२ पर्यत कार्यालयीन वेळेत अर्ज मागवण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदांचे नाव | तपशिल |
|---|---|---|
| १. | लेखापरिक्षण अधिकारी | पदसंख्या - ६ . |
| २. | पात्रता | अ. शासन विभाग / निमशासकीय विभाग / स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये लेखापरिक्षणचा १५ वर्ष काम केल्याचा अनुभव असलेले सेवानिवृत्त झालेले अधिकारी -कर्मचारी. |
| ३. | कामाचा तपशिल | महापालिका लेखापरिक्षण विभाग येथील अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाज. |
| ४. | मानधन | वर्ग १ व २ चे निवृत्त अधिकारी करीता मानधन रु. २५,०००/-<br>वर्ग ३ चे निवृत्त अधिकारी करीता मानधन रु. २०,०००/- |

**शर्ती व अटी -**

१. उमेदवारांने अर्जासोबत स्वत:चे अलिकडच्या काळातील फोटोसह अर्ज, अर्हता अनुभव, शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या आदेशाची प्रत, आधार कार्ड ओळखपत्र, जन्म तारिखेचा दाखला व पीपीओ ऑर्डर इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह अर्ज **मा. आयुक्त सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका यांचे नांवे प्रशासन अधिकारी (आस्था), कामगार कार्यालय, शाळा नंबर १ च्या समोरील इमारत पहिला मजला, सांगली. येथे दिनांक २९ /६/२०२२ रोजी अखेर सादर करण्याचा आहे.** मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

२. १५ वर्षे लेखापरिक्षणाचा अनुभव असल्याचे विहीत कागदपत्रे / दाखला अर्जासोबत जोडावीत.

३. प्राप्त अर्जाची छाननी अंती मुलाखतीची तारीख पात्र उमेदवारांना कळविण्यात येईल. उमेदवारांनी अर्जामध्ये सद्याचा राहण्याचा पत्ता व मोबाईल नंबर न चुकता नमुद करावा.

४. सदर सेवा करार पध्दतीने केलेली नियुक्ती हि निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील असुन या नियुक्तीचा महानगरपालिका आस्थापने वरील सेवेशी कोणताही संबंध नाही. नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास महानगरपालिकेच्या सेवेत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. अथवा कायदेशिर दाद मागता येणार नाही.

५. निवड होणा-या उमेदवारांना महानगरपालिकेच्या शर्ती अटी नुसार विवित नमुन्यात रुपये.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर बंधपत्र करुन देणे बंधनकारक राहील.

६. सदर जाहिरातीच्या नियुक्त्या,पदसंख्या, शर्ती अटी यामध्ये बदल कमी अधिक मजकुर इ.बदल वा प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांच्याकडे राखुन ठेवणेत आला आहे.

७. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ (सुधारीत ) मधील कलम १०५ व १०६ नुसार आपण केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षणाचा अहवाल मुख्य लेखापरिक्षक यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

मा.आयुक्तसो यांचे मान्यतेनुसार }

२२/६

(राहुल रोकडे)
उपायुक्त, (मुख्यालय)
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका.

क्र.मनपा /आस्थावि/ ५८८ /२०२२-२०२३
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक - २२/६/२०२२